# सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, सातारा

'किसान भवन', सर्व्हे क्र.५२३ ए/१, प्लॉट क्र. ५ व ६, कॅम्प, सदरबझार, जिल्हा परिषदेसमोर, सातारा
दुरध्वनी क्र.०२१६२ - २२७६३६ ते २२७६३९, वेबसाईट : www.sataradccb.com

## पाहिजेत

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, सातारा या बँकेत २६३ 'कनिष्ठ लेखनिक' व ६० 'कनिष्ठ शिपाई' या पदांची ऑनलाईन परीक्षा प्रक्रियेद्वारे सरळसेवा भरती करणेची आहे. सदर भरती प्रक्रियेसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविणेत येत आहेत. सदर ऑनलाईन फॉर्मस' www.sataradccb.in / www.sataradccb.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर फॉर्मस' (अर्ज) व परीक्षा शुल्क ऑनलाईन भरून त्याच संकेतस्थळावर प्रस्तुत (Submit) करावेत. सदर रिक्त पदे भरतीचे अनुषंगाने अधिक माहिती / निकष / पात्रता व इतर तपशिल www.sataradccb.in / www.sataradccb.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज स्विकारणेची अंतिम तारीख २१ ऑगस्ट २०२४ अखेर सायंकाळी ५.०० पर्यंत राहील. बँकेकडे थेट तथा पोस्ट / कुरीअर द्वारे आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सातारा

दिनांक : १२ ऑगस्ट २०२४

ठिकाण : सातारा

# सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, सातारा

'किसान भवन', सर्व्हे क्र.५२३ ए/१, प्लॉट क्र. ५ व ६, कॅम्प, सदरबझार, जिल्हा परिषदेसमोर, सातारा
दुरध्वनी क्र.०२१६२ - २२७६३६ ते २२७६३९

## नोकरभरतीची विस्तृत जाहिरात

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, सातारा या बँकेकरीता तृतीय श्रेणीतील रिक्त २६३ व चतुर्थ श्रेणीतील रिक्त ६० पदे ऑनलाईन परीक्षा प्रक्रियेद्वारे सरळसेवा भरती करण्याकरीता महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या पात्र उमेदवारांकडून निवड सूची तयार करणेसाठी विहीत नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यांत येत आहेत. बँकेचे संकेतस्थळ www.sataradccb.in / www.sataradccb.com या संकेतस्थळावर अर्ज उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| 1 | संकेत स्थळावर परीक्षा शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरणे दिनांक व वेळ | १२ ऑगस्ट २०२४ ते २१ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ५.०० पर्यंत. |
| 2 | ऑनलाईन परीक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रकाशित करण्यात येईल. |
| 3 | ऑनलाईन परीक्षा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रकाशित करण्यात येईल. |
| 4 | कागदपत्रे पडताळणी व मुलाखत दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रकाशित करण्यात येईल. |

### • सूचना •

1. उमेदवारांनी या नोकरभरती प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी बँकेच्या www.sataradccb.in / www.sataradccb.com या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे बंधनकारक राहील. परीक्षा शुल्क रक्कम रु.५००/- + १८ टक्के जीएसटी रु. ९०/- अशी एकूण रक्कम रु. ५९०/- ऑनलाईन पद्धतीने भरावयाची आहे. या व्यतिरिक्त उमेदवारांचे लेखी अर्ज व परीक्षा शुल्क बँकेच्या कोणत्याही कार्यालयात प्रत्यक्ष स्विकारले जाणार नाहीत व हे अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत.
2. परीक्षा शुल्क रक्कम रु.५००/- + १८ टक्के जीएसटी रु. ९०/- अशी एकूण रक्कम रु. ५९०/- ऑनलाईन भरल्याशिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण होणार नाही.
3. परीक्षा शुल्काची रक्कम रु.५००/- + १८ टक्के जीएसटी रु. ९०/- अशी एकूण रक्कम रु. ५९०/- उमेदवारांना ऑनलाईन पद्धतीनेच भरणा करता येईल.
4. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना स्वत: चा ईमेल-आयडी, मोबाईल क्रमांक व आधारकार्ड क्रमांक अचूक नमूद करणे आवश्यक आहे.

THE SATARA D.C.C. BANK LTD. SATARA

5. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना ज्या पदासाठी तो अर्ज करीत आहे त्या पदासाठी आवश्यक असणारी पात्रता धारण करीत असल्याची खात्री करूनच अर्ज भरावा. पात्र व अपात्र अर्जाबाबतची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

6. सदर भरती प्रक्रिये दरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणा-या भरती प्रक्रियेच्या अद्ययावत माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

7. संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरतेवेळी संकेतस्थळावर तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास <u>८९५६६६०३३६</u> हा हेल्पलाईन क्रमांक आहे. अर्ज भरण्यास अडचण निर्माण झाल्यास support@sataradccb.in या मेल आयडीवर ईमेलद्वारे संपर्क साधावा. वरील हेल्पलाईन क्रमांक व मेल आयडी फक्त काही तांत्रिक अडचणी (अर्ज भरतेवेळी, मुलाखत पत्र डाऊनलोड करतेवेळी इ.) निर्माण झाल्यास संपर्काकरीता आहे.

कनिष्ठ लेखनिक व कनिष्ठ शिपाई पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज विहीत नमुन्यात सादर करण्यासाठीची पात्रता, निकष व इतर तपशिल खालीलप्रमाणे राहील.

अ) <u>शैक्षणिक अर्हता</u> :-

| पदनाम | पदांची संख्या | वयोमर्यादा वर्षे | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| कनिष्ठ लेखनिक (Junior Clerk) | 263 | 21 ते 38 | • कोणत्याही शाखेचा पदवीधर (मान्यताप्राप्त विद्यापीठ) आणि एमएससीआयटी किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण.<br>• तसेच वाणिज्य शाखेचा पदवीधर / पदव्युत्तर पदवी व बँकिंग क्षेत्रातील लिपिक / वरिष्ठ श्रेणीतील कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव असल्यास प्राधान्य.<br>• त्याचप्रमाणे इंग्रजी / मराठी टंकलेखन, लघुलेखनाची परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य. |
| कनिष्ठ शिपाई (Junior Peon) | 60 | 18 ते 38 | • किमान इयत्ता १० वी परीक्षा उत्तीर्ण.<br>• तसेच इंग्रजीचे व संगणकाचे प्राथमिक ज्ञान आवश्यक. |

- दिनांक <u>३१ जुलै २०२४</u> रोजी उपरोक्त वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता प्राप्त व मुळ कागदपत्र असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.
- रिक्त पदांची संख्या कमी - जास्त होण्याची शक्यता आहे. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदे वाढल्यास उपलब्ध निवड यादीतून पात्र ठरलेल्या प्रतीक्षा यादीतील उमेदवारातून सदरची रिक्त पदे भरण्यात येतील. याबाबतचे सर्व अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत. तसेच सदर भरतीप्रक्रिया कोणत्याही कारणाशिवाय कोणत्याही टप्प्यावर थांबविणे अथवा रद्द करणेचे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत.
- अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून शारीरिक



THE SATARA D.C.C. BANK LTD. SATARA

क्षमतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

- उमेदवारास दि सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके लि, सातारा या बँकेच्या सातारा जिल्हयातील कोणत्याही शाखेमध्ये / बँकेच्या अन्य कार्यालयांमध्ये नियुक्ती देण्यांत येईल. नियुक्तीचे ठिकाणी उमेदवारास 10 दिवसाचे आत रूजू होणे आवश्यक राहील.

ब) वेतनश्रेणी

| | |
|---|---|
| कनिष्ठ लेखनिक | 910-35-1085-45-1310-45-1535-45-1760-45-1985 |
| कनिष्ठ शिपाई | 650-30-800-35-975-40-1175-45-1400-50-1650 |

क) निवड कार्यपध्दती :-

1. ऑनलाईन परीक्षा :-

कनिष्ठ लेखनिक व कनिष्ठ शिपाई या पदांकरीता संगणकाद्वारे ऑनलाईन परीक्षा घेण्यांत येईल. परीक्षेस येताना उमेदवाराने परीक्षा शुल्क पावती व शासनमान्य ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे. सदर ऑनलाईन परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरूपाच्या ९० प्रश्नांच्या प्रत्येकी १ गुण याप्रमाणे ९० गुणांची राहील. या ऑनलाईन परीक्षेसाठी ९० मिनिटांचा कालावधी राहील. ऑनलाईन परीक्षेसाठी खालील विषयांच्या विस्तृत अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नांचा समावेश असेल. गणित, बँकिंग व सहकार, सामान्य ज्ञान व चालू घडामोडी, कृषि व ग्रामीण अर्थव्यवस्था, मराठी, इंग्रजी, संगणक व माहिती तंत्रज्ञान, बुध्दीमापन चाचणी. तसेच ऑनलाईन परीक्षेचे माध्यम मराठी असेल.

2. कागदपत्र पडताळणी व मुलाखत :-

ऑनलाईन परीक्षेत प्राप्त होणा-या गुणांच्या गुणानुक्रमे उपरोक्त नमूद पद संख्येच्या 1:3 प्रमाणानुसार मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी (परीक्षेचा बैठक क्रमांक) बँकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. सदर मुलाखतीस पात्र उमेदवारांस शैक्षणिक व इतर संबधित मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी बँकेकडून करून घेणे बंधनकारक राहील. मुलाखतीसाठीचे मुलाखत पत्र ऑनलाईन पद्धतीने बँकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाईल. सदर मुलाखत पत्र ऑनलाईन पध्दतीने संकेत स्थळावरून डाऊनलोड करावे. मुलाखत पत्र डाऊनलोड करण्यास अडचण निर्माण झाल्यास support@sataradccbank.in या मेल-आयडीवर ई-मेलव्दारे संपर्क साधावा. कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र होणारा उमेदवारच बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीस पात्र होईल.

3. कागदपत्रे पडताळणी वेळेस विहीत मूळ कागदपत्रे /प्रमाणपत्रे सादर करणे.

सदर परीक्षेच्या निकालानंतर मुलाखतीसाठी पात्र झालेल्या उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार खालील कागदपत्रे / प्रमाणपत्रे मुलाखतीवेळी (लागू असलेली) सादर करणे अनिवार्य आहे. उमेदवारांनी कागदपत्रे / प्रमाणपत्रांची मूळ प्रत व दोन प्रमाणित झेरॉक्स प्रती सादर करणे अनिवार्य राहील. प्रमाणित झेरॉक्स प्रत मूळ प्रतीवरून पडताळणी केल्यानंतर प्रमाणित झेरॉक्स प्रत बँकेकडे जमा करावी लागेल.



THE SATARA D.C.C. BANK LTD. SATARA

| अ.क्र. | कागदपत्रे /प्रमाणपत्रे |
|---|---|
| 1 | शैक्षणिक अहर्तेचा पुरावा - कनिष्ठ लेखनिक यांचेकरिता पदवी प्रमाणपत्र / कनिष्ठ शिपाई यांचेकरिता इयत्ता १० वीचे प्रमाणपत्र. |
| 2 | जन्म दिनांकाचा पुरावा - इयत्ता १० वीचे प्रमाणपत्र. |
| 3 | *MS-CIT* अथवा समकक्ष प्रमाणपत्र. (कनिष्ठ लेखनिक पदासाठी) |
| 4 | टंकलेखन प्रमाणपत्र.(असल्यास) |
| 5 | लघुलेखन प्रमाणपत्र.(असल्यास) |
| 6 | अनुभव प्रमाणपत्र.(असल्यास) |
| 7 | उमेदवाराने अर्जात उल्लेख केलेली सर्व प्रमाणपत्रे. |
| 8 | विवाहित महिलांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा -महाराष्ट्र शासन राजपत्र. |
| 9 | जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचा प्रकल्पग्रस्त दाखला (असल्यास). |
| 10 | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे आणि उमेदवारास अन्य कोणतीही बँक / आर्थिक संस्था / अन्य संस्था यांनी त्यांच्या सेवेतून बडतर्फ / निलंबित केले नसलेबाबत स्वयंघोषणापत्र. (कागदपत्रे पडताळणीवेळी बँक स्तरावर नमुना उपलब्ध करून दिला जाईल.) |
| 11 | परीक्षा शुल्क पावती व शासनमान्य ओळखपत्र |

4. <u>मुलाखत</u>:-

कागदपत्रे पडताळणीमध्ये मुलाखतीस पात्र होणाऱ्या उमेदवारांची बँकेने गठीत केलेल्या समितीकडून मुलाखत घेण्यांत येईल. कनिष्ठ शिपाई पदासाठी मुलाखत १० गुणांची राहील. उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो अंतिम निवडीस पात्र राहणार नाही. कनिष्ठ लेखनिक पदासाठी गुणांचे भारांकन खाली नमूद केलेप्रमाणे असेल. त्यामध्ये 10 पैकी 5 गुण संबधित उमेदवारांच्या खालील शैक्षणिक पात्रतेनुसार देण्यांत येतील व उर्वरीत 5 गुण मौखीक मुलाखतीसाठी देण्यांत येतील.

| अ.क्र. | शैक्षणीक अर्हता | गुणांचे भारांकन |
|---|---|---|
| 1 | वाणिज्य / बँकिंग, कृषि व कृषि संलग्न, अभियांत्रिकी, संगणक, विधी, शास्त्र, व्यवस्थापन या शाखेतील पदवीधर/ पदव्युत्तर असल्यास. | 1 |
| 2 | JAIIB / CAIIB असल्यास. | 1 |
| 3 | Tally / Advanced Tally असल्यास. | 1 |
| 4 | राष्ट्रीयकृत / खाजगी / व्यापारी / सहकारी बँकेतील कामकाजाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असल्यास. | 1 |
| 5 | प्रकल्पग्रस्त दाखला असल्यास | 1 |
| | एकूण गुण | 5 |

THE SATARA D.C.C. BANK LTD. SATARA

5. उमेदवारांची अंतिम निवड सूची :-

उमेदवारांचे ऑनलाईन परिक्षेतील गुण व मुलाखतीचे गुण यांची बेरीज करुन एकूण 100 गुणांपैकी प्राप्त झालेल्या गुणानुक्रमे पात्र उमेदवारांची अंतिम निवड सूची व प्रतिक्षा यादी तयार करण्यांत येईल. तृतीय व चतुर्थ श्रेणीतील पदसंख्या विचारात घेता, अंतिम निवड सूची व प्रतिक्षा यादीमध्ये समान गुण प्राप्त झाल्यास प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

१. सातारा जिल्ह्यातील रहिवाशांना प्रथम प्राधान्यक्रम राहील.

२. कनिष्ठ लेखनिक पदासाठी पदव्युत्तर पदवी असलेल्या उमेदवारांना प्रथम प्राधान्यक्रम राहील.

३. पदवी परीक्षा प्रथम श्रेणीत उतीर्ण झालेल्या उमेदवारास प्रथम प्राधान्यक्रम देण्यात येईल.

४. वरील १ ते ३ मध्ये देखील समान पात्रता ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत सदर पदांच्या सेवा प्रवेश नियमामध्ये विहीत असलेल्या किमान शैक्षणिक अहर्तेमध्ये उच्चतम गुण प्राप्त उमेदवारास प्रथम प्राधान्यक्रम देण्यात येईल.

त्यानुसार अंतिम निवड यादीप्रमाणे / गुणवत्ता यादी प्रमाणे पात्र उमेदवारांना बँकेच्या कनिष्ठ लेखनिक व कनिष्ठ शिपाई पदी परिविक्षाधीन कालावधीकरीता नियुक्ती देण्यात येईल.

५. परिविक्षाधीन कालावधी (प्रोबेशन पिरियड) :-

निवड करण्यांत आलेल्या उमदेवारांना 1 वर्षासाठी परिविक्षाधीन (प्रोबेशनरी) सेवेत नेमणुक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधीन कालावधी मध्ये कनिष्ठ लेखनिक पदासाठी रु.14000/- तसेच कनिष्ठ शिपाई या पदासाठी रु. 10000/- दरमहा एकत्रित पगार देण्यांत येईल. सदर उमेदवारास नेमणूकी बाबतच्या बँकेच्या स्थायी आदेशातील व सेवा नियमावलीतील प्रचलित नियम, अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

६. अंतिम निवड झालेल्या उमेदवारास बँकेमध्ये किमान ३ वर्षे सेवा करणेबाबत करारपत्र / हमीपत्र करुन द्यावे लागेल.

७. नैसर्गिक आपत्तीमुळे अगर अन्य कारणामुळे विहित दिनांकास ऑनलाईन परीक्षा घेणे शक्य नसेल तर अन्य सोईच्या दिवशी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल.

८. वरील अटींमध्ये अथवा निवड प्रक्रियेच्या निकषामध्ये बँकेच्या मा. संचालक मंडळाने बदल केल्यास अशा बदलानुसार कार्यवाही करण्यात येईल. तो बदल उमेदवारांवर बंधनकारक राहील.

THE SATARA D.C.C. BANK LTD. SATARA

ड. ऑनलाईन परीक्षा शुल्क :

ऑनलाईन परीक्षेकरीता रक्कम रु.५००/- + १८ टक्के जीएसटी रक्कम रु. ९०/- असे एकूण रक्कम रु. ५९०/- शुल्क आकारले जाईल. सदर ऑनलाईन परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील. एकदा भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही किंवा इतर कोणत्याही परीक्षा किंवा निवडीसाठी राखीव ठेवता येणार नाही.

इ. ऑनलाईन परीक्षेसंदर्भात उमेदवारांना महत्वाच्या सुचना

1. निवड प्रक्रिया सुरु झालेनंतर किंवा निवडीच्या कोणत्याही क्षणी अगर निवड झाल्यानंतर उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती / कागदपत्रे तपासणीनंतर खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल. त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार / विनंती विचारात घेतली जाणार नाही.

2. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज दाखल केला किंवा तो त्या पदासाठीची अर्हता धारण करीत आहे म्हणजे ऑनलाईन परीक्षेस/ कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा/ नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

3. उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती अंतिम समजणेत येईल.

4. उमेदवारांनी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही पदाधिकारी / अधिकारी यांचेकडून शिफारस / दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास कोणत्याही टप्प्यावर अपात्र घोषीत करुन निवड प्रक्रियेतून बाद केले जाईल.

5. ऑनलाईन परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना मुलाखतीपूर्वी कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविले जाईल. त्यावेळी उमेदवारांना सर्व मुळ कागदपत्रे घेवून हजर रहाणे बंधनकारक राहील आणि यासाठी मुदतवाढ दिली जाणार नाही. कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर असलेल्या उमेदवारांना निवड प्रक्रियेतून बाद समजण्यात येईल.

6. उमेदवारांना ऑनलाईन परीक्षा, कागदपत्रे पडताळणी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

7. यापुर्वी बँकेकडे याच पदासाठी प्रत्यक्ष कागदोपत्री किंवा मेलव्दारे अर्ज केले असतील तर त्यांचे पूर्वीचे अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत. त्यांना नव्याने ऑनलाईन पध्दतीने विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

8. भरती प्रक्रियेत / निवड कार्यपध्दतीत बदल करण्याचा अधिकार बँकेस असेल व ऐनवेळी कांही बदल झाल्यास तो वर्तमानपत्रात किंवा बँकेच्या संकेत स्थळावर

SATARA D.C.C. BANK LTD.

प्रसिध्द केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांना वैयक्तीक स्वरूपात कळविले जाणार नाही.

9. त्यामुळे उमेदवारांनी भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेत स्थळावर सूचना पाहाव्यात. संकेत स्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत यास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. या भरती प्रक्रिया अनुषंगाने कोणत्याही उमेदवाराशी स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही.

10. उमेदवाराची ऑनलाईन परीक्षा प्रामुख्याने सातारा शहरातील केंद्रांवर घेण्यात येईल. मात्र परिक्षार्थीची संख्या विचारात घेवून आवश्यकतेनुसार इतर शहरातील केंद्रावरही परीक्षा घेतली जाईल. परिक्षार्थीची संख्या विचारात घेवून आवश्यकतेनुसार परीक्षा एकापेक्षा अधिक सत्रांमध्ये घेण्यात येईल.

11. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

12. बँकेने सदर भरती प्रक्रिया तसेच परिक्षेसंदर्भातील मार्गदर्शनासाठी कोणत्याही पब्लीकेशन एजन्सीची नियुक्ती केलेली नाही. यांसदर्भात कोणतीही जाहिरात अगर माहितीही बेकायदेशिर आहे असे समजण्यात यावे.

13. कांही अपरिहार्य / आपत्कालीन कारणास्तव परीक्षा स्थगित करणे / पुढे ढकलणे, अशंत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार बँकेस राहतील.

14. भरती प्रक्रियेसंदर्भात उदभवणारे वाद / तक्रारी बाबत बँकेचा निर्णय अंतिम राहील.

15. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतेवेळी उमेदवारांना कागदपत्रे सादर करावयाची नसली तरी ज्या उमेदवाराकडे आवश्यक शैक्षणिक अर्हता असेल त्यांनीच उमेदवारी अर्ज दाखल करावा.

३. ऑनलाईन अर्ज व ऑनलाईन परीक्षेचे शुल्क भरण्याची पध्दत :-

1. उमेदवाराने सर्वप्रथम संकेत स्थळावरील विस्तृत माहिती (Advertisement) व सूचना (How to Apply) वाचून घ्याव्यात त्यांनतर ऑनलाईन नोंदणी (New Registration) या लिंकवर क्लिक (Click) करावे. आणि उमेदवारांनी आपली ऑनलाईन नोंदणी करून जाहिरातीत दिलेल्या सूचनांचे अवलोकन करून ऑनलाईन अर्ज भरावा. सदर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्याची खात्री केल्यानंतर ऑनलाईन परीक्षा शुल्क भरावे. परीक्षा शुल्क भरल्यानंतर अर्ज दुरुस्त करण्याची सुविधा उपलब्ध असणार नाही.

   a) उमेदवारांनी त्यांचा अर्ज बँकेच्या संकेत स्थळावरून स्वत:च्या माहितीसाठी डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची राहील. अर्जाचा नमुना (PDF File) संकेतस्थळावर उपलब्ध आहे.



THE SATARA D.C.C. BANK LTD. SATARA

b) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना स्वतःची पूर्ण माहिती ही अचूक भरावी.

2. विविध पदाकरीता बँकेच्या www.sataradccb.in/ www.sataradccb.com या अधिकृत संकेत स्थळावरुन ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज स्विकारण्यांत येतील. इतर कोणत्याही प्रकारचे अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आय.डी. व मोबाईल क्रमांक चूकीचा/अपूर्ण असल्यास तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपूर्ण प्रक्रिये दरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील. त्याचप्रमाणे ई-मेल आयडी व संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना एजन्सी जबाबदार राहणार नाही. सदर भरती प्रक्रिये दरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यांत येणाऱ्या भरती प्रक्रियेच्या अद्यावत माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

3. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यांत येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्र व पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्याच्या पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. सदर पात्रतेबाबतच्या खोटया माहितीच्या आधारे ऑनलाईन अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांवर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यांत येईल. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना कांही चुकी झाल्यास किंवा त्रुटी राहिल्याने भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. विस्तृत माहितीमध्ये नमुद केलेल्या सर्व अटी व शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इ.बाबतची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

4. उमेदवारांची ऑनलाईन परीक्षाही ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी /छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या फक्त गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पूर्ण छाननी नंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यांत येईल. ऑनलाईन परीक्षेच्या प्राथमिक चाळणी नुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी करण्यांत येईल. सदर छाननी प्रक्रियेत अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यांत येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवाराला भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर

SATARA D.C.C. BANK LTD. SATARA

अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

5. ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी करावयाच्या सविस्तर सूचना बँकेच्या www.sataradccb.in/ www.sataradccb.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. सदर ऑनलाईन अर्ज संकेत स्थळावर दिनांक २१ ऑगस्ट २०२४ रोजी सांयकाळी 5.00 वाजेपर्यंत पर्यंत खुला राहील.

6. ऑनलाईन अर्ज वेबसाईटवर भरण्याची अंतिम तारीख दिनांक २१ ऑगस्ट २०२४ रोजी 5.00 वाजेपर्यंत असून त्यानंतर संकेत स्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

7. परिक्षा शुल्काची रक्कम व अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीनेच स्विकारले जातील. अन्य कोणत्याही मार्गाने परीक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही. परिक्षा शुल्क दिनांक २१ ऑगस्ट २०२४ रोजी सांयकाळी 5.00 वाजेपर्यंत ऑनलाईन स्विकारले जाईल. परिक्षा शुल्क ऑनलाईन भरलेले उमेदवारच ऑनलाईन परिक्षेस पात्र राहतील.

8. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वत:चे अद्यावत "JPG/PNG" या प्रकारामध्ये स्कॅन केलेले छायाचित्र (फोटो) व पाढं-या कागदावर काळया शाईच्या पेनाने स्वत: स्वाक्षरी करून स्कॅन केलेली "JPG/PNG" प्रकारची स्वाक्षरी स्कॅन करून www.sataradccb.in/ www.sataradccb.com या संकेत स्थळावरील सूचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. छायाचित्र (फोटो) स्कॅन केलेली इमेजची साईज 2MB असावी. तसेच स्वाक्षरीच्या स्कॅन केलेल्या इमेजची फाईल साईज 2MB असावी (त्या पेक्षा जास्त मोठी फाईल अपलोड होणार नाही).

9. उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना स्वत:चे आधारकार्ड "JPG/PDF/PNG" या प्रकारामध्ये स्कॅन करून www.sataradccb.in/ www.sataradccb.com या संकेत स्थळावरील सूचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. आधारकार्ड स्कॅन केलेल्या ईमेजची साईज 2MB असावी.

10. ऑनलाईन परीक्षेची माहिती उमेदवारांस ई-मेल/एस.एम.एस.व्दारे कळविण्यांत येईल. तसेच ऑनलाईन परीक्षेचे प्रवेश पत्र, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती व विविध सूचना या केवळ बँकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध होतील, सदर माहिती पोस्टाव्दारे पाठविण्यांत येणार नाही. सदर भरती प्रक्रियेदरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणारी भरती प्रक्रियेची अदययावत माहिती अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.



THE SATARA D.C.C. BANK LTD. SATARA

उमेदवारास परीक्षेचे प्रवेशपत्र ऑनलाईन पध्दतीने डाऊनलोड करता येईल. त्यासाठी उमेदवारांनी त्यांचा अर्ज भरतांना रजिस्ट्रेशन नंबर, युजर आयडी व पासवर्ड जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

11. राष्ट्रीयकृत / व्यापारी / खाजगी व सहकारी बँका आणि अन्य आर्थिक संस्थामधून बडतर्फ / निलंबित केलेले उमेदवार भरती प्रक्रियेसाठी पात्र असणार नाहीत. उमेदवारांनी ही माहिती बँकेस न देता भरती प्रक्रियेत सहभागी झाला आणि सदर बाब बँकेच्या निदर्शनास आल्यास भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा बँकेमध्ये नियुक्ती झालेवरही उमेदवारास अपात्र करणेत येईल.

उपरोक्त पात्रता निकष व निवड प्रक्रियेच्या निकषामध्ये बँकेने बदल केल्यास सदर बदलानुसार कार्यवाही करण्यांत येईल व तो बदल उमेदवारांवर बंधनकारक राहील.

दिनांक : १२ ऑगस्ट २०२४

ठिकाण : सातारा

मुख्य कार्यकारी अधिकारी

THE SATARA D.C.C. BANK LTD. SATARA